आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८, क्वीन्स गार्डन, जुने सर्किट हाऊस जवळ, पुणे -४११००१
Website: trti.maharashtra.gov.in
दुरध्वनी - ०२०-२६३३०८५४

जा.क्र./आसंप्रसं/२०२४-२५/स्पर्धा परीक्षा/सूचनापत्र/का.०४/ ३९९२ दि.२८/०८/२०२५

## सूचनापत्र

महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाची स्वायत्त संस्था असलेल्या आदिवासी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या युवक-युवतींना विविध स्पर्धा परीक्षांचे पूर्व प्रशिक्षण दिले जाते. यामध्ये युपीएससी-नागरी सेवा परीक्षा, एमपीएससी-राज्यसेवा, अभियांत्रिकी सेवा, न्यायिक सेवा, अराजपत्रित गट ब व गट क सेवा परीक्षा, बँक, रेल्वे, एल.आय.सी. व लिपिक वर्गीय पदांकरीताच्या परीक्षा, स्टाफ सिलेक्शन कमिशन, महाराष्ट्र राज्य शिक्षक पात्रता परीक्षा व पोलीस व सैन्य भरती परीक्षा इ. स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमांचा समावेश होतो.

सन २०२५-२६ करीताच्या उपरोक्त नमूद विविध स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने उमेदवारांकडून ऑनलाईन स्वरुपात अर्ज मागविण्यात आले आहे. त्यानुसार ज्या उमेदवारांनी यापूर्वी आदिवासी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (TRTI) मधील कोणत्याही पूर्व प्रशिक्षण योजनेचा लाभ घेतला असेल अशा उमेदवारांना काठीण्य पातळीनुसार चढत्या क्रमाने (Higher Examination) दुबार लाभ घेण्याची संधी देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली होती. त्याप्रमाणे काठीण्य पातळीनुसार चढत्या क्रमाने (Higher Examination) येणाऱ्या स्पर्धा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमाकरीता पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्याने पूर्वी तुलनेने कमी काठीण्य पातळी स्पर्धा पूर्व प्रशिक्षणाचा लाभ घेतला असला तरी सबंधित विद्यार्थ्यास प्रवेशास पात्र करण्याच्या प्रस्तावास शासन मान्यता देण्यात आली आहे.

**तरी सामाईक प्रवेश परीक्षा २०२५ करीताच्या ऑनलाईन अर्ज भरण्याच्या प्रक्रियेस (लिंक मुदतवाढ) दि.०४/०९/२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. तरी याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

(दिपा मुधोळ - मुंडे, भा.प्र.से)
**आयुक्त,**
**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे**